निवडक

केळबाय-कुर्टी येथे 'सायबर क्राईम आणि सायबर फ्रॉड' विषयी जागृती

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २० : राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने जनशक्ती वेल्फेर असोसिएशन, केळबाय कुर्टी फोंडा गोवा व इनर व्हिल क्लब ऑफ फोंडा हिलटावन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर क्रायम आणि सायबर फ्रॉड'विषयी जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.
या कार्यक्रमात फोंडा येथील ओजस्वीनी शर्मा यांनी सदर विषयी मार्गदर्शन केले व उपस्थितांना या गंभीर समस्येविषयी जागृत करण्यात आले . कुर्टी गावचे नागरिक तसेच युवकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. उद्घाटन समारंभला जनशक्ती वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष विशांत वसंत गावडे, इनर व्हिल क्लब ऑफ फोंडा हिलटावन यांच्या अध्यक्षा श्रीमती नंदिनी कानाबूर, जनशक्ती वेल्फेअर असोसिएशनचे सचिव संजय कुर्टीकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जनशक्ती वेल्फेअर असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. कीरण गावडे यांनी केले.

नववर्ष स्वागत समिती म्हापसातर्फे उद्या स्वागत कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. २० : अयोध्येतील श्री राम मंदिराच्या उद्घाटन वर्धापनदिन प्रित्यर्थ नववर्ष स्वागत समिती म्हापसातर्फे बुधवार दि. २२ रोजी स्वागत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समितीचे सचिव नारायण शिंदे यांनी दिली. संध्याकाळी सात वाजता समस्त रामभक्त येथे हनुमान मंदिरासमोरील शिवाजी महाराजांच्या पुतळा समोर खुल्या जागेत जमणार आहेत हुतात्मा चौकात पण त्या प्रज्वलित करण्यात येणार आहे आठ वाजता प्रमुख पाहुणे वल्लभ केळकर राम मंदिर संदर्भात विचार मांडतील त्यानंतर महाआरती कार्यक्रम टाळमृदंगाच्या तालावर सादर केला जाईल सर्व रामभक्त ने आपल्या घरावर भगवा झेंडा फडकवून तसेच रात्रीच्या वेळी पणत्या आरास करून साजरा करावी वरील कार्यक्रम त मोठ्या संख्येने हजर राहावे असे आवाहन नव वर्ष स्वागत समितीने केले आहे.

हळर्ण येथे ओम चषक क्रिकेट स्पर्धा २ फेब्रुवारीपासून सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. २० : ओम कला सांस्कृतिक केंद्र – हळर्ण पेडणेतर्फे अखिल गोवा आणि सिंधुदुर्ग जिल्हा मर्यादित ओम चषक टेनिस चेंडू क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ग्रामपंचायत आणि नगरपालिका पातळीवर रविवार दि. २ फेब्रुवारी, शनिवार दि. ८ फेब्रुवारी रविवार दि ९ फेब्रुवारी २०२५ रोजी भाटले मैदान – हळर्ण येथे खेळविण्यात येणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या संघास रोख रु. ३३,३३३ व चषक, उपविजेत्या संघास रोख रु. १५,५५ चषक तसेच आकर्षक वैयक्तिक पारितोषिके देण्यात येतील. या स्पर्धेसाठी प्रवेश फि फक्त रु. ३३०० आहे, अधिक माहितीसाठी राज (९२८४७९९४७२), यश (९५७९८७०९२३) यांच्याशी संपर्क साधावा असे आयोजकांकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे.

जनमत कौलाने गोव्याची ओळख जपली : ॲड. उदय भेंब्रे

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २० : राजभाषा संचालनालयाने जनमत दिनानिमित्त उत्तर आणि दक्षिण गोव्यात विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले होते. दक्षिण गोव्यात केपे येथील सरकारी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या एम. ए. कोंकणी विभागाच्या संयुक्त विद्यमाने ओपिनियन पोल: गोव्याच्या अस्तित्वाची चळवळ या विषयावर एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कोंकणी लेखक आणि विचारवंत ॲड. उदय भेंब्रे यांनी जनमत कौल दिनाच्या आठवणी आणि घटनांची माहिती दिली. ओपिनियन पोल स्वतः अनुभवलेले ड. उदय भेंब्रे यांनी १९६३ ते १९६७ काळातील महत्वाच्या प्रसंगांवर प्रकाश टाकला. या दिनामुळे गोव्याचे अस्तित्व जपले असे ॲड. भेंब्रे म्हणाले. राजभाषा संचालक प्रशांत शिरोडकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जॉयदीप भट्टाचारजी, कार्यक्रम समन्वयक प्रा. दीपराज सातोर्डेकर, एम. ए. कोंकणी विभागाचे प्रमुख सुशांत नायक, कनिष्ठ अनुवादक स्नेहा सबनीस, बी.ए. कोंकणी विभागाच्या प्रमुख डॉ. राखी आमोणकर, प्रा. जोफा गोन्साल्विस, प्रा. ग्लिनिस डायस, प्रा. शमिका बाळ्ळीकर आणि इतर शिक्षक तसेच विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. राजभाषा संचालक प्रशांत शिरोडकर यांनी जनतेला जनमत कौल दिवसाबद्दल योग्य माहिती देण्यासाठी ॲड. उदय भेंब्रे हे योग्य व्यक्ती आहेत आणि म्हणून विद्यार्थ्यांना याची ओळख करून देण्यासाठी आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी दोन कार्यक्रम आयोजित करण्यात आले असे सांगितले. प्राध्यापक सुशांत नायक यांनी स्वागत केले. प्राध्यापक दिपराज सातोर्डेकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. अनुवादक स्नेहा सबनीस यांनी आभार मानले. उत्तर गोव्यात खांडोळा येथील सरकारी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या कोंकणी विभाग आणि राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने जनमत कौल दिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक संदेश प्रभुदेसाई यांनी जनमत कौलाच्या इतिहासावर प्रकाश टाकला. जनमत कौलाच्या दिनी गोव्याला स्वतंत्र अस्तित्व मिळाले आणि त्या काळात तरुणांनी मोठ्या प्रमाणात योगदान दिल्याचेही संदेश प्रभुदेसाई यांनी पुढे सांगितले. याच दिवसामुळे गोमंतकीय आज आपले विचार व्यक्त करू शकतात, असे ते पुढे म्हणाले. राजभाषा उपसंचालक अनिल सावंत यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. पुर्णकला सामंत यांनी स्वागत केले. प्रा. पृथ्वी नायक यांनी सूत्रसंचालन केले आणि मान्यवरांचा परिचय करून दिला. प्रा. दिव्या गोवेकर यांनी आभार मानले. कोंकणी विभागाचे प्रमुख प्रा. प्रकाश वजरीकर, राज्यशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. सीमा साळगांवकर, प्रा. डॉ. रेश्मा खोलकर, प्रा. किरण पालकर, प्रा. निलेश नायक, प्रा. अकबर गदेड, प्रा. डॉ. नवू वरक आणि विविध विभागांचे शिक्षक आणि विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. दोन्ही कार्यक्रमांमध्ये सुमारे २३० विद्यार्थी, शिक्षक आणि सरकारी कर्मचाऱ्यांना जनमत कौल दिनाची माहिती देण्यात आली.

फोंड्यात २५ रोजी काव्य संवाद मैफल

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. २० : गोवा मराठी अकादमी, फोंडा तालुका प्रभाग समिती आणि स्वामीराज प्रकाशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने सदाबहार नायगावकर कवी अशोक नायगावकर यांची धमाल काव्य-संवाद मैफल आणि मुलाखत आयोजित केली आहे. साहित्यिक पत्रकार परेश प्रभू संवादक असून, कार्यक्रम शनिवारी दि. २५ रोजी फोंडा येथे आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम फोंडा येथील राजीव गांधी कला मंदिरांच्या परिषद सभागृहात शानिवारी दि. २५ रोजी संध्याकाळी ४ वाजता होणार आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष अनिल सामंत उपस्थित राहणार असून सन्माननीय अतिथी आय. एम. बी. पणजीचे अध्यक्ष दशरथ परब, गो.म.अ. फोंडा तालुका प्रभाग अध्यक्ष नीलेश नाईक, स्वामीराज प्रकाशकनचे रजनीश राणे उपस्थित असतील. सूत्रसंचालन जगदीश फडके करणार आहे, अशी माहिती प्रभाग सचिव प्रा.वरदा गाड केरकर यांनी कळवले आहे.

मुंबई रणजी संघात रोहित १० वर्षांनी खेळणार

मुंबई, दि. २० :

मुंबई क्रिकेट संघ २३ जानेवारी रोजी जम्मू-काश्मीर विरुद्ध रणजी ट्रॉफी सामना खेळणार आहे. यासाठी आता मुंबई क्रिकेट असोसिएशनने सामन्यासाठीचा संघ जाहीर केला आहे. भारतीय राष्ट्रीय संघातून खेळणाऱ्या अनेक खेळाडूंना संघात स्थान मिळाले आहे. यामध्ये कर्णधार रोहित शर्मा, युवा फलंदाज यशस्वी जैस्वाल, श्रेयस अय्यर आणि शार्दुल ठाकूर यांनाही संधी मिळाली आहे.

भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा सध्या खराब फॉर्मशी झुंजत असून ऑस्ट्रेलिया दौऱ्यातही त्याची बॅट शांत होती. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील पाच डावात केवळ रोहित केवळ ३१ धावा करू शकला. यानंतर रोहित शर्मा मुंबईला आल्यानंतर वानखेडे स्टेडियममध्ये मुंबईच्या रणज क्रिकेट संघासह सराव करताना दिसला. तेव्हापासूनच रोहित रणजी खेळणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. अखेरीस रोहित शर्माने रणजी ट्रॉफी खेळणार असल्याचे जाहीर केल्यानंतर आता त्याचा आगामी मुंबई वि जम्मू काश्मीर सामन्यासाठी संघात समावेश करण्यात आला आहे. रोहित शर्मा २०१३ मध्ये उत्तर प्रदेशविरूद्ध अखेरचा सामना खेळला होता.

मुंबई संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी अजिंक्य रहाणेकडे सोपवण्यात आली आहे. हार्दिक तामोरे आणि आकाश आनंद यांचा यष्टीरक्षक म्हणून संघात समावेश करण्यात आला आहे. तर दुसरीकडे आयपीएलमध्ये अनसोल्ड राहिलेल्या शार्दुल ठाकूरला संधी मिळाली आहे. त्याला चांगली कामगिरी करून पुन्हा एकदा टीम इंडियात आपली स्थान मिळवण्याचे त्याचं लक्ष्य असेल. तर रोहित शर्मा व्यतिरिक्त यशस्वी जैस्वाल, श्रेयस अय्यर यांनाही संघात संधी देण्यात आली आहे.

रोहित शर्माचा प्रथम श्रेणीतील रेकॉर्ड चांगला आहे. त्याने आतापर्यंत १२८ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ९२८७ धावा केल्या आहेत, ज्यात २९ शतकांचा समावेश आहे. प्रथम श्रेणीतील त्याची सर्वोच्च धावसंख्या ३०९ धावा आहे. त्याच्या नावावर ३३६ लिस्ट-ए सामन्यांमध्ये १३१०८ धावा आहेत. अजिंक्य रहाणे (कर्णधार), रोहित शर्मा, यशस्वी जैस्वाल, आयुष म्हात्रे, श्रेयस अय्यर, सिद्धेश लाड, शिवम दुबे, हार्दिक तामोरे (यष्टीरक्षक), आकाश आनंद (यष्टीरक्षक), तनुष कोटियन, शम्स मुलानी, हिमांशू सिंग, शार्दुल ठाकूर, मोहित अवस्थी, सिल्वेस्टर डिसूजा, रायस्टन डायस, कर्ष कोठारी.

लखनऊ सुपर जायंट्सचा ऋषभ पंत कर्णधार

मुंबई, दि. २० :

ऋषभ पंतला लखनऊ सुपर जायंट्सचा (एलएसजी) नवा कर्णधार बनवण्यात आले आहे. तो केएल राहुलची जागा घेणार आहे. ऋषभ पंत दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधारही आहे.

मला पंतांमध्ये जन्मजात लीडर दिसतो. तो एक जबरदस्त लीडर आहे. मला वाटते की तो आयपीएलचा सर्वोत्तम कर्णधार होऊ शकतो. लोक 'माही, रोहित'ला आयपीएलच्या सर्वात यशस्वी कर्णधारांच्या यादीत ठेवतात. माझे शब्द लिहून ठेवा, १०-१२ वर्षांनी ते 'माही, रोहित आणि ऋषभ पंत' असतील. मेगा लिलावानंतर पंतला लखनऊचा कर्णधार बनवण्याची चर्चा होती. फ्रेंचायझीने नोव्हेंबर-२०२४ मेगा लिलावात पंतला २७ कोटी रुपयांना (अंदाजे यूएस३.२१ दशलक्ष) विकत घेतले होते. यासह पंत आयपीएलचा सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे.

पंतने यापूर्वी तीन हंगामात (२०२१, २०२२ आणि २०२४) दिल्ली कॅपिटल्सचे नेतृत्व केले आहे, जरी त्याच्या नेतृत्वाखाली संघ २०२१ च्या प्लेऑफमध्ये पोहोचला. कार अपघातानंतर तो २०२३ च्या हंगामातून बाहेर पडला होता.

ऋषभ पंत लखनऊ सुपरजायंट्समध्ये केएल राहुलची जागा घेणार आहे. केएल राहुलने मागील हंगामात (२०२२, २०२३, २०२४) एलएसजीचे नेतृत्व केले. पहिल्या दोन वर्षांत या संघाने प्ले-ऑफमध्ये प्रवेश केला, मात्र अंतिम फेरी गाठू शकला नाही. २०२४ चा हंगाम खूपच खराब होता, संघ % व्या स्थानावर राहिला.

मी माझ्या नवीन टीमसोबत खूप खूश आहे. आमच्या संघात युवा आणि वरिष्ठ खेळाडूंचा समतोल चांगला आहे. आता या फ्रेंचायझीला नव्या उंचीवर कसे नेणार याचा विचार करायला हवा. मला माहिती आहे की ही एक नवीन सुरुवात आहे, नवीन मताधिकार आहे. मात्र, माझ्या कर्णधार किंवा क्रिकेट खेळण्याच्या पद्धतीत फारसा बदल होणार नाही. हो, त्यात बरीच भर पडणार हे नक्की. संघाची रणनीती काहीही असली तरी त्यानुसारच पुढे जाईल.

संगीत मानवी जीवन सुखमय बनविते : मंत्री गावडे

काणकोण कलाकार संघाचे १७ वे संगीत संमेलन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २० : संगीताकडे ओढ निर्माण करणे गरजेचे आहे कारण संगीत मानवी जीवन सुखमय बनविते. संगीत गाण्यापुरते नसून जीवन तणावमुक्त यामुळे होते. आपल्या संस्कृतीमुळे गोवा ओळखला जातो, असे प्रभावी विचार कला आणि संस्कृती मंत्री गोविंद गावडे यांनी व्यक्त केले.

काणकोण कलाकार संघ आयोजित १७ व्या संगीत संमेलन काणकोणच्या रविंद्र भवनातील लता मंगेशकर कलांगणातील स्व.संजय बांदेकर सभागृहात उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून श्री गावडे बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर राज्यसभा खासदार सदानंद तानावडे, काणकोणच्या नगराध्यक्षा सारा देसाई, जिल्हा पंचायत सदस्य शोभना वेळीप, स्थानिक नगरसेवक हेमंत नाईक गावकर, संमेलनाध्यक्ष रमाकांत कोमरपंत, अध्यक्षा मनुजा नाईक गावकर,सचिव हरिश्चंद्र खोलकर, डॉ.प्रवीण गावकर, कमलाकर म्हाळशी आदी उपस्थित होते. समई प्रज्वलीत करुन उदघाटन कार्यक्रमाला सुरुवात केली. प्रास्ताविक, परिचय व स्वागत अध्यक्षा गावकर यांनी केले, उपाध्यक्ष नारायण देसाई, सचिव श्री. खोलकर, खजिनदार सतीश देसाई, सदस्य माया नाईक, सुभाष कोमरपंत, स्मिता महाले, नेत्रा नाईक, आशा नगर्सेकर, पुजा नाईक, गणाधीश नगर्सेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

दिवंगत कलाकारांना श्रद्धांजली देऊन संघातर्फे काढलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांहस्ते करण्यात आले. कलिकार संघाचे जेष्ठ सदस्य अजित पैंगीणकर यांचा मानपत्र, शाल श्रीफळ आणि स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. मानपत्राचे वाचन नारायण देसाई यांनी केले. तर राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षिका चंद्रलेखा पाटील, राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षिका प्रतिमा प्रभुदेसाई, विजय च्यारी, भजनी कलाकार गजानन पागी, शशिकांत म्हाळशी यांचा खासदार तानावडेहस्ते गौरव करण्यात आला. तसेच स्वस्तिक व्यंकटराय नाईक, संपदा देसाई, बरखा नाईक, अभिषेक म्हाळशी व सुयश कामत या उभरत्या कलाकारांना सन्मानीत केले.

यावेळी बोलताना सदानंद शेट तानावडे यांनी काणकोण कलाकारांची खाण असून या तालुक्याने गोवा मुक्ती संग्रामात महत्वाची भुमिका बजावल्याचा आपल्या शैलीत उल्लेख करतानाच गोवा प्रशासनात कर्तव्यदक्ष असे अधिकारी दिलेले आहेत. संगीत क्षेत्रातही आज येथील दिग्गज कलाकार वावरत आहेत. कलाकार संघाच्या आतापर्यंतच्या कार्याचा गौरव करून युवा पिढीने पूढे यावे, असे मत व्यक्त केले.

सत्कारमूर्ती पैंगीणकर यानी यावेळी ज्येष्ठ कलाकारांचा उल्लेख करून कलाकार संघाने वर्षभर कार्यक्रमाकडे लक्ष देण्याची सूचना केली.तसेच स्वमालकीची वास्तू उभी करण्यासाठी प्रयत्न करावे असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनील फळदेसाई यानी केले. तर सचिव खोलकर यानी अहवाल वाचन केले. उपाध्यक्ष नारायण देसाई यांनी मान्यवरांचे व अन्य सर्वांचे आभार व्यक्त केले.

कोलवाळ येथे 'कथा ही आई जरी मरीची' महानाट्य प्रयोगाला प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

साळ, दि. २० : कोलवाळ येथील जरी मरी देवीच्या शतकोत्तर जत्रोत्सवानिमित्त जरी मरी देवस्थानात जरी मरी देवीची महती सांगणारे 'कथाही आई जरी मरीची' हे लघु महानाट्य हजारोच्या संख्येने रसिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत सुस्थितीत व उत्कंठा पूर्वक प्रतिसादात पार पडले. महिला, पुरुष, मुले व मुली, असे अंदाजे ९० कलाकारांना घेऊन हे महानाट्य सादर केले. लेखन, नाट्य संकल्पना आणि दिग्दर्शनाची बाजू सांभाळली गोव्यातील प्रतितयश संपादक, नाट्यकर्मी, रंगकर्मी श्रीयुत ज्ञानेश्वर शांताराम पार्सेकर यांनी आणि त्यांना प्रताप गोवेकर व अभिमन्यु गोवेकर यांनी सहाय्य केले.

नाट्याची सुरुवात जत्रोत्सवाच्या आरतीने होते व काही लहान मुले आजोबांना कथा सांगण्यासाठी आग्रह करतात. त्यावेळी आजोबा जरी मरी देवी व ज्या वारखंडकर घराण्यात जरी मरी देवी निवास करते. त्यांची कथा या महानाट्याद्वारे प्रस्तुत होते. मावळणकर कुटुंब आणि जरी मरी

देवी यांची यांची महती सांगणारे हे नाट्य डिचोली तालुक्यातील गावठाण या गावात वास्तव्यास असलेले मावळणकर कुटुंब डिचोली तालुका क्षेत्रात स्थापित करण्यासाठी साखळीचा वीरभद्र दाखवला नंतर गावठाणची घोडे मोडणे सादर केली.

काही कारणास्तव मावळणकर कुटुंब डिचोली तालुक्यातून स्थलांतर होऊन पेडणे तालुक्यातील विठ्ठलादेवी, वारखंड या गावी येऊन पोहोचतात येथे वारकरी वारखंडची तालगडी आणि रोमटामेळ यांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. गावात महामारी रूप पसरते, ती दूर करण्यासाठी देवी प्रकट होते पण काही लोक तिला उणं धुणं बोलून दुषणे देतात, या कारणान ती तिथे आपले सत्व दाखवण्यासाठी अग्नी प्रज्वलित करते आणि ती विझवते.

नंतर ती कोलवाळ गावात येऊन त्यावेळी श्रीराम जय राम जय जय राम ही भूपाळी आणि या भूपाळीवर उत्कृष्ट असं नृत्य संकलन जरी मरीची मोठी बांधण्यात येते आणि त्यावेळी आनंदोत्सव साजरा करण्यासाठी मुसळ नृत्य देखणी आणि कशी नृत्य हे गोमंतकीय लोकनत्य यांचं अप्रतिम सादरीकरण जरी मरी देवीचे सत्व दाखवणारे तिथे चमत्कार दाखवणारे दहा-बारा प्रसंग दिग्दर्शने दिग्दर्शकाने आपल्या सृजनशील कला कृतीने दिग्दर्शित केले आणि शेवटी देवीचे महत्व सांगणारे लोक नृत्य सादर करून या महानाट्याची सांगता करण्यात आली.

दिग्दर्शक ज्ञानेश्वर शांताराम पारसेकर यांनी उत्तम लेखन दिग्दर्शन आणि नाट्य संकल्पनेची जबाबदारी व्यवस्थितपणे पार पडली त्यांना साथ दिली.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १३९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 139 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .